स्थापत्य कामाच्या निविदा मंज
करण्याच्या अधिकारात व
करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. स्थाकानिअ-२०११/प्र.क्र.३३/फ-५

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक-१४/३/२०१२

पहा- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक -विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम,दि.१५मे २००९

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-२४/वअ/प्रशा-४/६०१/२००९-१०,

नागपूर, दिनांक ३० सप्टेंबर, २००९

**प्रस्तावना** : -

वन विभागातील क्षेत्रीय अधिका-यांना स्थापत्य कामाच्या निविदा मंजूर करण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय : -**

वन विभागातील क्षेत्रीयस्तरावरील स्थापत्य कामे अधिक प्रभावीपणे होण्यासाठी व बांधकाम साहित्य व मजूरीत वाढ झाल्यामुळे स्थापत्य कामांच्या निविदा मंजूर करण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने याबाबत त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६७१/विनियम दि.१४.१२.२०११ च्या संमतीने व वित्तीय अधिकार प्रदान समितीच्या मान्यतेने अधिकारात वाढ करण्यास मान्यता दिली आहे. खालील परिशिष्टानुसार स्थापत्य कामाच्या निविदा मंजूरीच्या अधिकारात वाढ करण्यात येत आहे. तथापि परिशिष्टात विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च अपेक्षित असल्यास अथवा विहीत अटी किंवा त्यातील एखादी अट पूर्ण होत नसेल तर अशा प्रस्तावास वित्त विभागाची वित्तीय अथवा प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे

## परिशिष्ट

| अ.क | प्रचलीत शक्ती /नवीन शक्तीचे वर्णन (प्रचलित शक्ती असल्यास आदेश क्रमांक व दिनांक ) | अधिकाराचा वापर करण्यास सक्षम अधिकारी | प्रचलित मर्यादा (रक्कम लाखात) | या शासन निर्णयान्वये मंजूर अधिकाराचा वापर करण्यास सक्षम प्राधिकारी | या शासन निर्णयान्वये मंजूर प्राधिकारी यांच्या मर्यादा (रक्कम लाखात) | अटी व शर्ती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ५ | ६ | ७ |
| १ | स्थापत्य कामाच्या निविदा मंजूरीचे अधिकार प्रदान | मुख्य वनसंरक्षक | १०.०० | अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक | ५०.०० | |
| | हे अधिकार sr.no 12 (7) (8) (9) of parts of manual of financial powers 1964 या नुसार क्र. शासन महसूल व वन विभाग पत्र क्र. एमएफटी-१०९४/७५२/प्र.क्र.३९० / फ-५ दि.१२ जानेवारी, १९९५ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत. | वनसंरक्षक | ५.०० | मुख्य वनसंरक्षक | ३०.०० | तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीच्या अधिन राहून |
| | | उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी/स्वतंत्र विभागाचे उप विभागीय वन अधिकारी | ०.२० | वनसंरक्षक | २०.०० | |
| | | | | उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी /स्वतंत्र विभागाचे उप विभागीय वन अधिकारी | २.०० | |

२. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

३. संदर्भ क्रमांक-१ येथील शासन निर्णयासोबत सहपत्र - ३ म्हणून सहपत्रित परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. डीसीएन-१०७५/र.व का.दिनांक-९ एप्रिल, १९७५ मधील सूचना वित्तीय अधिकार प्रदान केलेल्या सर्व अधिका-यांना तंतोतंत लागू राहतील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

E:\Note2012\Stapatya kamachya niveda manjur karane.doc

४.    हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६७१/विनियम दि.१४.१२.२०११च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.                    असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

**(विवेक खांडेकर)**
**सह सचिव (वने) ,**
**महसूल व वन विभाग.**

प्रती.
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. उप मंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव,
मा. प्रधान सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई-३२
सचिव व्यय (वित्त विभाग
सचिव, ले. व को. वित्त विभाग,
महालेखापाल-१ ( लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य मुंबई
महालेखापाल-२ ( लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
महालेखापाल-१ ( लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-२ ( लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख ), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
उप संचालक, लेखा व कोषागारे, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व मुख्य वनसंरक्षक
सर्व वनसंरक्षक
सर्व उप वनसंरक्षक
सर्व वनक्षेत्रपाल
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (विनियम),अर्थ-६,व्यय-१०, मंत्रालय, मुंबई-३२
कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
वन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती फ-५